महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com  www.facebook.com/maharashtra.c.times  Info@maharashtracrimetimes.com  Twitter- @MHCrimeTimes  Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: ११ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार १५ जून २०२१ ते सोमवार २१ जून २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

जीवनात कोणतीही गोष्ट गरजेपेक्षा जास्त मिळाली की ती विष बनते मग ती ताकत असो, गर्व असो, पैसा असो वा भूक...!

## थोडक्यात

### ‘म्युकर मायकोसिस’चा मृत्यूदर करोनाच्या सातपट

**कराड (विशाल कारंडे):** करोना प्रादुर्भावाच्या महासाथीमध्ये आता म्युकरमायकोसिस म्हणजेच काळ्या बुरशीची लागण झालेले रूग्णही वाढू लागले आहेत. सातारा जिल्ह्यात करोना संसर्ग नियंत्रणात येत असतानाच आता ‘म्युकरमायकोसिस’चा मृत्यूदर करोनाच्या जवळपास सातपट असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यामुळे करोनाबरोबरच ‘म्युकर मायकोसिस’ला रोखण्याचेही आव्हान प्रशासन व आरोग्य यंत्रणेसमोर उभे राहिले आहे. सातारा जिल्ह्यात आजवर म्युकरमायकोसिसची बाधा



झालेल्या रूग्णांची १२२ वर पोहोचली आहे. त्यातील ६८ जण उपचाराधिन असून या आजाराने १९ रूग्ण दगावलेत. या आजारासाठीच्या उपचारात वापरण्यात येणारी औषधे जेमतेम उपलब्ध असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुभाष चव्हाण यांनी दिली.

### ‘मोदी सरकारने जगाला दिलेली शिकवण आधी स्वतः अंमलात आणावी’; चिदंबरम यांचा खोचक टोला

**नवी दिल्ली (प्रगती शर्मा)** - दहशतवाद, हुकुमशाही आणि हिंसक अतिरेकामुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांपासून मूल्यांचे रक्षण करण्यासाठी भारत ‘जी-७’ राष्ट्रांचा सहयोगी असल्याची भूमिका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केली. लंडनमध्ये होत असलेल्या ‘जी-७’



राष्ट्रांच्या परिषदेमध्ये पंतप्रधान मोदींनी व्हर्चुअल माध्यमातून सहभाग घेऊन भारताची भूमिका मांडली. महत्त्वाचे म्हणजे मोदींनी केलेल्या ‘ट्रेड रिलेटेड इंटेलेक्च्युअल प्रॉपर्टी राईट्स’ (ट्रीप्स) करारातून सूट देण्याच्या आवाहनाला ऑस्ट्रेलियानेही समर्थन दिले. याच दरम्यान काँग्रेसचे नेते पी चिदंबरम यांनी मोदी सरकारवर जोरदार टीका केली आहे. पी चिदंबरम यांनी मोदींनी परिषदेत केलेल्या भाषणाची प्रशंसा करत सणसणीत टोला लगावला आहे. ’उ-७ बैठकीमधील पंतप्रधान मोदींचं भाषण प्रेरक आणि विडंबनात्मकही. मोदी सरकारने जगाला दिलेली शिकवण आधी भारतात अंमलात आणावी’ अशा शब्दांत चिदंबरम यांनी टीकास्त्र सोडलं आहे.

# मोदी सरकार १२ वर्षावरील मुलांनाही लस देण्याच्या तयारीत; भारत बायोटेकशी चर्चा सुरु



**नवी दिल्ली (हिंदुस्थान समाचार)**- देशात कोरोना विषाणूची दुसरी लाट आता काहीशी नियंत्रणात असल्याचे सरकारी आकडेवारीवरून दिसत आहे. सरकारने लसीकरणाची गती वाढविली आहे. आता मुलांसाठी लसीकरण सुरू करण्याच्या सरकारच्या धोरणावर वेगानं काम सुरू आहे. मोदी सरकारने १२-१८ वर्ष वयोगटातील १ कोटी ३० लाख मुलांपैकी सुरुवातीला ८० टक्के लसीकरण वेगात करण्याचं लक्ष्य ठेवलं आहे.



यासाठी सरकारला दोन डोसच्या कोरोना लशीचे किमान २ कोटी १० लाख डोस उपलब्ध करावे लागणार आहेत. अहवालानुसार १२-१५ वर्षे वयोगटातील बालकांच्या वापरासाठी युरोपीय युनियनमध्ये फाइजरच्या mRNA लसीच्या चाचण्यांना परवानगी देण्यात आली आहे. एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, भारतात मुलांसाठी कोवॅक्सिन तयार करण्यासाठी स्वदेशी क्षमतांचा वापर केला जावू शकतो. भारत बायोटेक कडून अद्यापही मुलांच्या लसीकरण चाचण्यांवर काम सुरू आहे. फायजरची लस तयार झालीच तरी ती देशात येण्यासाठी किती वेळ लागेल याबाबत खात्री नसल्यानं मुलांसाठी स्वदेशी लस निर्माण करण्यावर सरकारचा भर आहे. या संदर्भात भारत बायोटेकच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, कंपनी मोठ्या ऑर्डर पूर्ण करण्यास सक्षम आहे.

### केंद्राच्या धोरणात कुठल्याही राज्याला घरोघरी जाऊन लसीकरण करु नका असं सांगितलेलं नाही : केंद्र सरकार

केंद्र सरकारच्या धोरणात कुठल्याही राज्याला घरोघरी जाऊन लसीकरण करू नका असं सांगितलेलं नाही, मात्र ते करू नये असा आमचा सर्वांना सल्ला आहे, असं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. याचा अर्थ कुणावरही ते करण्यास केंद्र सरकारनं बंदी घातलेली नाही, असं मुंबई उच्च न्यायालयानं म्हटलं आहे. घरोघरी जाऊन लसीकरणासंदर्भात हायकोर्टात दाखल याचिकेवर सुनावणी सुरू आहे. मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीष कुलकर्णी यांच्या खंडपीठापुढे अ‍ॅड. धृती कपाडिया यांच्या याचिकेवर सुनावणी सुरू आहे.

## करोनाच्या दुसऱ्या लाटेत अमरावती विभागात ३४१ शेतकऱ्यांच्या आत्महत्या!

**नागपूर (गणेश बागडे)**- राज्य शासन शेतकऱ्यांसाठी खूप काही करत असल्याचे दाखवते. परंतु जानेवारी २०२१ ते मे २०२१ या करोनाच्या दुसऱ्या लाटेतील कालावधीत अमरावती विभागातील पाच जिल्ह्यांत ३४१ शेतकऱ्यांनी



आत्महत्या केली. दरम्यान आत्महत्यांच्या चौकशीत आर्थिक कारण असलेल्या शेतकऱ्यांना पात्र ठरवत त्यांच्या कुटुंबीयांना १ लाख रुपये शासन मदत करते. परंतु ३१ मे २०२१ पर्यंत येथील एकूण आत्महत्यांपैकी ६७.१५ टक्के प्रकरणांची (२२९ प्रकरणे) चौकशी प्रलंबित असल्याचेही सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी माहितीच्या अधिकारातून पुढे आणले आहे. अमरावती विभागातील सर्वाधिक १०३ आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यातील आहेत. येथे ६३ प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. इतर प्रकरणांतील १५ प्रकरणे पात्र, २५ प्रकरणे अपात्र असून १५ पात्र शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना शासनाने आर्थिक मदत केली. बुलढाणा जिल्ह्यात ९७ आत्महत्या झाल्या. त्यातील ८२ प्रकरणांची चौकशी प्रलंबित आहे. इतर प्रकरणांत २ प्रकरणे पात्र तर १३ प्रकरणे अपात्र आहे. येथे २ पात्र कुटुंबीयांना आर्थिक मदत केली गेली. अमरावतीत ७३ आत्महत्या झाल्या.

## शिवसेनेला चार कारकुन सांभाळणार असतील तर मला कधीही मान्य होणार नाही; राज ठाकरेंचे शब्दच ‘सेनावापसी’ रोखणार?

**मुंबई (जसबीरकौर भामरा):** विधानसभा निवडणुकीनंतर राज्याच्या राजकारणात बरीच उलथापालथ झाली आहे. शिवसेनेने भाजपची साथ सोडून काँग्रेस-राष्ट्रवादीचा हात धरला. त्यामुळे राज्यात नव्या राजकारणाची नांदी सुरू झाली आहे. त्यातच गेल्या आठवड्यात मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना उद्धव ठाकरे-राज ठाकरे एकत्र येणार का? असा सवाल करण्यात आला. तेव्हा परमेश्वरालाच ठाऊक असं सांगून राज यांनी शिवसेनेबरोबरच्या युतीची दारे उघडी केली आहे. त्यामुळे राज-उद्धव ठाकरे एकत्र येण्याच्या चर्चांनी जोर धरला आहे. असं असलं तरी मनसेची शिवसेनेसोबत युती होण्याची शक्यता फारच कमी असल्याचं सांगितलं जात आहे. त्याला कारण राज ठाकरे यांनी शिवसेना सोडताना केलेलं भाषण असल्याचं बोललं



जात आहे. २७ नोव्हेंबर २००५ रोजी राज ठाकरेंनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला. त्यावेळी त्यांनी दादरच्या कृष्णकुंज निवासस्थानासमोर कार्यकर्त्यांशी संवाद साधला होता. त्यावेळी त्यांनी शिवसेनेतील गटबाजी आणि शिवसेना सोडण्यामागची कारणमीमांसा केली होती. ‘शिवसेना ही या महाराष्ट्राची या देशाची गरज आहे. शिवसेना संपावी, मोडावी, तिचं काही होवो, अशी माझी आजपर्यंत कधी इच्छा नव्हती. यापुढेही कधी नसणार. पण शिवसेनाप्रमुखांनी उभी केलेली एवढी मोठी बलाढ्य संघटना जर चार कारकुन सांभाळणार असतील तर ते मला कधीही मान्य होणार नाही. आणि या चार सहा कारकुनांच्या जीवावर मी महाराष्ट्रात जाऊन यांचा प्रचार करायला तयार नाही’. असं राज ठाकरे म्हणाले होते. त्यामुळे राज यांच्या सेनावापसीमध्ये ही कारकुन मंडळीच पुन्हा अडथळा निर्माण करण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शिवाय एकीकडे राज ठाकरे यांचा जनाधार घटतो आहे, तर शिवसेनेचा जनाधार वाढत आहे.

## स्वबळाचा नारा देणाऱ्या नाना पटोलेंना अजित पवारांनी फटकारलं; म्हणाले...

**मुंबई (योगेश होळंब)**- काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी २०२४ च्या निवडणुकीत स्वबळाचा नारा दिल्याने राजकीय वर्तुळात सध्या चर्चा रंगली आहे. इतकंच नाही तर हायकमांडने मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी दिली तर स्वीकारेन असंही सूतोवाच नाना पटोले यांनी केलं आहे. आगामी निवडणुका महाविकास आघाडी म्हणून लढवाव्या या राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या भूमिकेविरोधात नाना पटोले यांनी भूमिका घेतली असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हापुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना नाना पटोले यांना फटकारलं आहे. ‘राज्यातील निवडणुकीबाबतचा अंतिम अधिकार काँग्रेसच्या नेत्या सोनिया गांधी, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांना आहे. त्यामुळे कोणी काही विधान करत असेल तर त्याला महत्त्व नाही,’ असं मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केलं. निवडणुका स्वबळावर



निवडणूक लढवण्याचे विधान करणारे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या मताला त्यांनी महत्त्व नसल्याचं त्यांना यावेळी अधोरेखित केलं. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका काँग्रेस पक्षाने स्वबळावर लढवाव्यात अशी कार्यकर्त्यांची भूमिका असल्याचे सांगतानाच २०२४च्या विधानसभा निवडणुकीत राज्यात काँग्रेस सर्वात मोठा पक्ष म्हणून सत्तेत येईल.

## तेलंगणा, मध्यप्रदेश प्रशासनाने पाणी सोडण्या व अडवण्यापूर्वी पूर्वसूचना द्यावी - एकनाथ शिंदे

**गडचिरोली (राकेश गायकवाड):** तेलंगाणामधील मेडीगट्टा प्रकल्पातून पाणी सोडताना व अडवताना गडचिरोली जिल्हा प्रशासनाला पूर्व सूचना द्यावी, जेणेकरुन सिरोंचा तालुक्यातील, गोदावरी नदीच्या काठावरील गावांतील रहिवाशांना वेळेत सूचना देता येईल आणि त्यांना सुरक्षितस्थळी हलवता येईल, अशी सूचना गडचिरोलीचे पालकमंत्री व राज्याचे नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गोसीखुर्द धरणाच्या पूरस्थितीबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. गेल्यावर्षी अचानक पाणी सोडल्याने व जिल्हा प्रशासनाला पूर्व सूचना न दिल्याने गोसीखुर्दमध्ये पाणी वाढले. यामुळे विदर्भात पूर परिस्थिती निर्माण होऊन शेतीचे मोठे नुकसान झाले होते. त्यामुळे यंदा अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी शिंदे यांनी सूचना केल्या आहेत. एकनाथ शिंदे म्हणाले की, मध्य प्रदेशातील संजय



सरोवराचे पाणी वैनगंगा, गोसीखुर्दमध्ये वाढल्याने गोसीखुर्द धरणाचे पाणी सोडावे लागते. परिणामी वैनगंगा आणि प्राणहिता या दोन नदी काठावरच्या गावांना फटका बसतो. गोसीखुर्दमधून पाणी सोडल्यावर ते पाणी गडचिरोलीत येण्यासाठी बारा ते पंधरा तास लागतात. त्यामुळे मध्यप्रदेश व तेलंगणा सरकारने पाणी सोडताना व अडवताना गडचिरोली जिल्हा प्रशासनाला कळवावे त्यामुळे नियोजन योग्य पध्दतीने करता येईल, असे शिंदे यांनी स्पष्ट केले. तेलंगणा प्रशासन व आपल्या प्रशासनात समन्वय ठेवणे गरजेचे आहे. तेलंगणातील श्रीराम सागर व कडेम या दोन धरणातून पाणी सोडल्याने गोदावरी नदीला पूर येतो. गोदावरी नदी सिरोंच्या मधून जाते. पाणी वाढल्यावर प्राणहिताचा प्रवाह थांबतो व बॅकवॉटर तयार होते. त्यामुळे सिरोंचा तालुका व अहेरी बॉर्डर विभागात पूरस्थिती उद्भवते. गोसीखुर्दमधून पाणी सोडतानादेखील गडचिरोली जिल्हा प्रशासनाला मुख्य अभियंत्यांनी वेळेवर पूर्वसूचना द्यावी. त्यामुळे काठावरील गावातील नागरिकांना सुरक्षित स्थळी नेता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत बोलताना, एकनाथ शिंदे यांच्या सूचनांची दखल घेतली जाईल.

## राज्याने धाडस करावं; केंद्राचं मी बघतो – उदयनराजे भोसले

**मुंबई (विशाल पाटील)**- मराठा आरक्षणासाठी राज्याने एक दिवसाचं विशेष अधिवेशन बोलवावं अशी मागणी भाजपा खासदार छत्रपती उदयनराजे यांनी केली आहे. उदयनराजे आणि संभाजीराजे यांच्यात पुण्यामध्ये मराठा आरक्षणाच्या मुद्यावर पुण्यात बैठक झाली. यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना उदयनराजे यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. ‘मराठा आरक्षण ही राज्याची जबाबदारी आहे. जर हे सगळे आमदार, खासदार एवढे धुतल्या तांदळासारखे स्वच्छ असतील तर नेमकी समस्या काय आहे. उद्धव ठाकरे, अजित पवार सोडून द्या सगळेष्ठमी सगळ्यांबद्दलच विचारतोय. विशेष अधिवेशन बोलवा ना तुम्हीष्ठलाईव्ह प्रक्षेपण करा. पण हे सभागृहात गेल्यावर एक बोलतात आणि बाहेर आल्यावर दुसरं बोलतात,’ अशी टीका यावेळी त्यांनी केली. केंद्राच्या भूमिकेसंबंधी विचारण्यात आलं असता ते म्हणाले की, ‘दम असेल तर अधिवेशन बोलवावं. आधीने राज्याने धाडस असेल तर अधिवेशन घेऊन दाखवावं नंतर मी केंद्राचं पाहतो,’ असंही ते म्हणाले आहेत. ‘अधिवेशन बोलवून गायकवाड कमिशनच्या रिपोर्टवर चर्चा करावी. आता जस्टीस भोसले यांचा रिपोर्ट आला आहे. थप्पी



गोळा करुन काय रद्दीत विकून त्यावर राज्य चालवणार का? काय फालतुगिरी सुरु आहे,’ असा संताप व्यक्त करताना उदयनराजेंनी यांना आधी अधिवेशन घेऊ द्या, मग रुपरेषा ठरवतो. मग एकेकाला कसं गाठायचं ते मी बघतो असा इशाराही यावेळी त्यांनी दिला. ‘आपण जात कधी पाहिलेली नाही, पण आता तर लहानपणाचे मित्रदेखील अंतर ठेवून बोलतात. ही फळी कोण निर्माण करत आहे, तर ते राज्यकर्ते करत आहे. समाजाचा याच्याशी काही संबंध नाही. आरक्षण द्यायची इच्छाच नसून राजकारण करायचं आहे. व्यक्तीकेंद्रीत राजकारण सुरु असून उद्रेक झाला तर राज्यकर्ते जबाबदार असतील. त्यावेळी आम्हीदेखील थांबवू शकणार नाही. आम्ही आडवे आलो तर आमच्यावरही हल्ला करायला थांबणार नाहीत. अशी वेळ येऊ देऊ नका, पण ही वेळ येणार आहे,’ अशी भीती उदयनराजेंनी व्यक्त केली आहे.

## मुंबईकरांचे हाल! एसटी बसेसची सेवा बंद

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)**- एसटी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी कोरोनाच्या कठीण काळातही अत्यावश्यक सेवा सुविधा पुरवली. कोरोना व्हायरसच्या पहिल्या लाटेपासून एसटी महामंडळासह कर्मचाऱ्यांनी आपलं कर्तव्य योग्य पद्धतीने पार पाडलं. सध्या कोरोनाची दुसरी लाट कमी झाली आहे. या लाटेदरम्यान, महाराष्ट्रात लॉकडाऊनमुळेउपनगरी लोकल गाड्या सर्वसामान्यांसाठी बंद ठेवल्या गेल्या. बेस्ट व्यतिरिक्त एसटी महामंडळाच्या काही गाड्याही मुंबईत धावत होत्या. पण ही सेवा १४ जूनपासून निलंबित केली जाईल अशी माहिती परिवहन मंत्री अनिल परब यांनी ट्विटरद्वारे दिली आहे. लॉकडाऊनमुळे लोकल



गाड्या सर्वसामान्यांसाठी बंद करण्यात आल्या होत्या. यामुळे सार्वजनिक वाहतुकीवर होऊ नये यासाठी मुंबईत बेस्टसह एसटी बसेसही धावत होत्या. पण सोमवारपासून ही सेवा बंद करण्यात आली आहे. यामुळे आज मुंबईत ठिकठिकाणी गर्दी पाहायला मिळत आहे.

## महाविकास आघाडी सरकारमध्ये शिवसेनेचा मुख्यमंत्री पूर्ण पाच वर्षे राहील -संजय राऊत

**मुंबई (योगेश होळंब)**- महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये शिवसेनेचा मुख्यमंत्री पूर्ण पाच वर्षे राहील. त्यामध्ये कुठलाही वाटा किंवा घाटा होणार नाही, असे शिवसेना नेते, खासदार संजय राऊत यांनी सांगितले.

नाशिक येथे पत्रकार परिषदेत खासदार संजय राऊत बोलत होते. महाविकास आघाडी सरकार स्थापनेच्या प्रक्रियेतील मी एक घटक होतो, साक्षीदार होतो. पूर्णकाळ राज्याचे मुख्यमंत्रीपद हे शिवसेनेकडे राहील, अशी कमिटमेंट सुरुवातीपासूनच केलेली आहे. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनीही परवा जाहीरपणे हेच सांगितले, असे खासदार राऊत म्हणाले. २०२४ ला पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदीच सत्ता घेतील यावर ते म्हणाले की, पश्चिम बंगालचा पराभव हा भाजपचा नसून नरेंद्र मोदी, अमित शहा यांचा आहे असे मीडिया म्हणते. तामीळनाडू, केरळमध्ये त्यांची जादू चालली नाही. त्यामुळे २०२४ चे आडाखे आताच बांधता येणार नाहीत. राजकारण हे चंचल असते. ते स्वर्गीय पंडित नेहरू, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी यांच्यासह कुणालाच आपल्या मुठीत ठेवता आले नाही. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार आणि प्रशांत किशोर यांची भेट हा राजकीय व्यवस्थापनाचा भाग होता, असे ते म्हणाले. मराठा आरक्षणासाठी मोर्चा काढण्याचा कुणी विचार करीत असेल तर हा मोर्चा दिल्लीत निघायला हवा. मराठा आरक्षणासंदर्भात अमेंडमेंट करण्याचा, घटनेमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार हा संसदेकडे, प्रधानमंत्र्यांचा, राष्ट्रपतींचा आहे, असं सर्वोच्च न्यायालय म्हणतंय. आपण सगळ्यांनी एकजुटीने दिल्लीत जायला हवे.

याप्रसंगी कृषीमंत्री दादा भुसे,



शिवसेना उपनेते बबनराव घोलप, नाशिक जिल्हा संपर्कप्रमुख भाऊ चौधरी, जळगाव जिल्हा संपर्कप्रमुख संजय सावंत, खासदार हेमंत गोडसे, आमदार सुहास कांदे, आमदार नरेंद्र दराडे, आमदार किशोर दराडे, जिल्हा परिषद अध्यक्ष बाळासाहेब क्षीरसागर, जिल्हाप्रमुख विजय करंजकर, सुनील पाटील, माजी आमदार वसंत गिते, अनिल कदम, राजाभाऊ वाजे, योगेश घोलप, माजी जिल्हाप्रमुख दत्ता गायकवाड, सुनील बागुल, माजी महापौर विनायक पांडे, महानगरप्रमुख सुधाकर बडगुजर, महापालिका विरोधी पक्षनेते अजय बोरस्ते, गटनेते विलास शिंदे आदी उपस्थित होते. पंढरपूरच्या आषाढी वारीसंदर्भात सरकारने घेतलेले निर्णय हे लोकांचे प्राण वाचावेत, त्यांचे आरोग्य सुरक्षित राहावे, या भावनेने घेतले आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे सरकारने, प्रशासनाने दुसरी लाट मोठ्या कष्टाने आटोक्यात आणली आहे. विरोधी पक्षाला जर तिसऱ्या लाटेची तयारी करायची असेल तर त्यांनी भडकविण्याची कामे करावीत.

# तंत्रशुद्ध इंधन भडका...!



संपादक:- राकेश शंकर गोरे

**भारताच्या अनेक शहरांमध्ये पेट्रोलने शंभरी गाठली आहे व डिझेलही त्याच मार्गावर आहे. गेले वर्षभर इंधनाच्या किमती चढ्या राहिल्या. अपवाद फक्त निवडणूक काळाचा. निवडणूक प्रचाराच्या महिन्यांत या किमती स्थिर होत्या आणि निकाल लागताच पुन्हा चढू लागल्या. इंधनाच्या दरवाढीमध्ये सरकारचा काहीही हात नाही, बाजारपेठेनुसार त्या वाढतात वा कमी होतात हा केंद्र सरकारचा दावा किती खोटा आहे हे यावरून लक्षात येईल. बिहार निवडणुकीच्या वेळीही इंधनाच्या किमती वाढलेल्या नव्हत्या. पेट्रोलियम कंपन्या आर्थिक निर्णय घेण्यास स्वायत्त असल्याचे सांगितले जात असले तरी इंधनाच्या किमतीवर सरकारची बारीक नजर असते व दरवाढ ही प्रचाराचे साधन होणार नाही याबाबत दक्षता घेतली जाते हे आता सर्वांनाच कळून चुकले आहे. भारतात इंधन इतके महाग का हे वेगळे सांगण्याची गरज नाही.**

सरकारच्या तिजोरीत हमखास पैसे आणण्यासाठी याहून चांगला मार्ग नाही. हा मार्ग केंद्र व राज्य या दोन्ही सरकारांसाठी फायद्याचा आहे. दोन्ही सरकारांचे मुख्य उत्पन्न इंधनावरील कर हेच आहे. दरवाढीसाठी विरोधी पक्षांची राज्य सरकारे केंद्राकडे बोट दाखवित असली तरी स्वतःच्या राज्यातील व्हॅट कमी करीत नाहीत. तो केला तरी महाराष्ट्रातील पेट्रोल २० रुपयांनी स्वस्त होईल. ठाकरे सरकार ते करणार नाही, कारण इंधनावरील कर हे हमखास उत्पन्नाचे साधन आहे. आज केंद्र व सर्व राज्य सरकारे मिळून ४०० अब्ज रुपये इंधनावरील करातून मिळवितात. इतकी रक्कम अन्य कोणतेही क्षेत्र देऊ शकत नाही. इंधनावरील कर हा पूर्वीपासून चढा होता. पण मोदी सरकारने सरकारच्या मिळकतीचे ते प्रमुख साधन बनविले आणि तंत्रशुद्धरीतीने कर जमा केला. हे तंत्र म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर कमी झाले तरी भारतातील दर चढे ठेवायचे व कराचे उत्पन्न अनेक पटीने वाढवायचे.

मनमोहनसिंग सरकारपेक्षा मोदी सरकारने इंधन दरवाढीतून तिपट्टीहून जास्त उत्पन्न मिळविले असल्याचे आकडेवारी सांगते. मोदी सरकारने हा पैसा गरिबांसाठीच्या अनेक योजनांसाठी वापरला आहे हे खरे असले तरी या योजना चालविण्यासाठी मध्यमवर्गाचा खिसा खाली केला जात आहे. मध्यमवर्गाच्या हे अद्याप लक्षात आलेले नाही. पेट्रोल दरवाढीचा मोठा फटका मध्यमवर्गाला बसतो. गेल्या वर्षभरात मध्यमवर्गाचा पेट्रोलवरील महिन्याला सरासरी खर्च ४ टक्क्यांनी वाढला, म्हणजे तितका पगार कमी झाला. आता डिझेलही महागल्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्नही दरवाढीच्या तुलनेत कमी झाले आहे. याशिवाय दरवाढीमुळे वाहतूक खर्च वाढतो व त्याचा परिणाम उद्योगक्षेत्रातील सर्व व्यवसायांवर होतो.

महागाई वाढण्याचे ते एक प्रमुख कारण असते. रिझर्व्ह बँकेने त्याकडे लक्ष वेधले आहे व इंधनावरील करांचा पुनर्विचार करावा असे आवाहन केंद्र व राज्य सरकारांना केले. त्याचा काही परिणाम होईल असे दिसत



नाही. कारण कोविडच्या काळात अर्थव्यवस्था मंदावल्यामुळे उत्पन्नाचे अन्य मार्ग कोरडे पडले आहेत. सरकारमधील अनेक खाती गेले वर्षभर कामाशिवाय आहेत; पण त्यांचा पगार कमी झालेला नाही. तो खर्च सरकारच उचलीत आहे. कोविडने कणा मोडलेल्या गरिबांसाठीच्या नव्या योजनांना लागणारा पैसा सरकारला फक्त इंधनावरील करातूनच मिळतो. कदाचित यामुळेच इंधन दरवाढीविरोधात जनतेचा उद्रेक दिसत नाही व भाव वाढले तरी मध्यमवर्गाचे मोदी प्रेम आटलेले नाही.

पेट्रोल व डिझेल यांना जीएसटीमध्ये आणणे हेही सोपे नाही. सध्या पेट्रोलवर १६१ टक्के तर डिझेलवर १२४ टक्के इतका भरभक्कम कर आहे व जीएसटीची कमाल मर्यादा २८ टक्के आहे. म्हणजे पेट्रोल व डिझेलला जीएसटीमध्ये आणून ४०० अब्ज रुपये करातून मिळवायचे असतील तर इंधनाच्या किमतीमध्ये १०० टक्क्यांहून अधिक वाढ करावी लागेल. हे करण्याची हिम्मत कोणत्याच सरकारमध्ये नाही.

ब्रेन्ट क्रूडवरून आंतरराष्ट्रीय बाजारात किमती ठरतात. गोल्डमन सॅकच्या ताज्या अहवालानुसार ब्रेन्ट क्रूड ८० डॉलरपर्यंत चढेल. म्हणजे बाजारपेठ भारताला अनुकूल नाही. रुपयाच्या तुलनेत डॉलर महागला की तेलही महाग होते. ती शक्यताही पुढील काळात आहे. जगातील आर्थिक व्यवहार पूर्वपदावर येऊ लागले की तेलाची मागणी वाढेल आणि त्यानुसार भावही वाढतील. बाजारातील या घडामोडी आणि मंदावलेली स्थानिक अर्थव्यवस्था पाहता तंत्रशुद्ध मार्गाने इंधनावरील कर वाढते ठेवून तिजोरी भरणे व गरिबांच्या योजना राबविणे याकडे सरकारचा कल राहील हे स्पष्ट आहे. उद्योग, व्यवसाय, व्यापार यातून अर्थव्यवस्था बलवान झाली तरच इंधनकरावरील अवलंबित्व कमी होईल. परंतु, या शाश्वत मार्गावर चालण्याचा उत्साह मोदी सरकारमध्ये आहे असे गेल्या सात वर्षांतील कारभारातून दिसत नाही.

## वाशीतील उड्डाणपुलाचे भवितव्य सिडकोच्या हातात

**नवी मुंबई (धनश्री सट्टा)-** वाशीतील अरेंजा कॉर्नर ते कोपरी गावापर्यंत उभारण्यात येणाऱ्या उड्डाणपुलाचा प्रकल्प प्रशासकीय यंत्रणांतील टोलवाटोलवीमुळे रखडण्याची चिन्हे आहेत. या पुलासाठी जवळपास साडेतीनशे कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यातील निम्मा खर्च सिडकोने करावा, अशी अपेक्षा नवी मुंबई महापालिकेने व्यक्त केली आहे. सिडकोकडून पावणेदोनशे कोटींचा निधी मिळाल्याखेरीज या पुलाच्या कामाचे आदेश न देण्याच्या सूचना महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी अभियंता विभागाला केल्या आहेत. या निधीसाठी पालिकेने सिडकोशी पत्रव्यवहारही केला आहे. नवी मुंबई शहरातील वाहतूक व्यवस्थेचे सुसूत्रीकरण करण्यासाठी महापालिकेने काही प्रकल्प आखले आहेत. तसेच शहरातील मोक्याच्या ठिकाणांचा अभ्यास करून ३६ अपघात प्रवणक्षेत्र निश्चित करण्यात आले आहेत. यापैकी पामबीच मार्गाचा भाग असलेल्या वाशीतील अरेंजा कॉर्नर ते कोपरी गावापर्यंतच्या रस्त्यावरील वाढती वर्दळ आणि अपघात यांच्या पार्श्वभूमीवर पालिकेने येथे उड्डाणपूल उभारण्याचा प्रस्ताव आखला आहे. या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात आली असून सर्वात कमी दराची ३२६ कोटी खर्चाची निविदा आली आहे, मात्र हा खर्च संपूर्णपणे करणे पालिकेला शक्य नसल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. करोनाकाळात विविध आरोग्य उपाययोजनांवर पालिकेचे शंभर



कोटींपेक्षा अधिक रुपये खर्च झाले असून पालिकेच्या तिजोरीला ओहोटी लागली आहे. त्यामुळे अरेंजा कॉर्नर ते कोपरी या पुलासाठी ३२६ कोटी रुपयांचा देकार आल्याने पालिकेने सध्या या निविदेचे कार्यादेश दिलेले नाहीत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यासोबत झालेल्या एका बैठकीत पालिकेने शहरातील मोठ्या प्रकल्पांसाठी सिडकोने आर्थिक मदत करावी, असा प्रस्ताव मांडला आहे. पालिका क्षेत्रातही सिडकोचे अनेक भूखंड विक्रीविना पडून असून पालिकेच्या पायाभूत सुविधांमुळे या भूखंडांना चांगली किंमत येत असल्याची भूमिका पालिकेने मुख्यमंत्र्यांकडे मांडलेली आहे.

## ठाण्यातील २० 'आपला दवाखाने' बंद

**ठाणे (आकाश कांबळे)-** शहरातील २० ठिकाणी 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' उपक्रमाद्वारे महापालिका खासगी संस्थेच्या माध्यमातून नागरिकांना विनामुल्य आरोग्य सुविधा देत आहे. शिवसेना आणि महापालिकेचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखला जातो. परंतु गेल्या सहा महिन्यांत महापालिकेकडून एक रुपयाचेही देयक अदा करण्यात आलेले नसल्यामुळे संबंधित संस्थेने शुक्रवारपासून दवाखाने बंद केले आहेत. त्यामुळे करोना काळात नागरिक आरोग्य सुविधेपासून वंचित राहण्याची भिती व्यक्त होत आहे.

ठाणे महापालिका क्षेत्राची लोकसंख्या २६ लाखांच्या घरात पोहोचली आहे. शहरात ५२ टक्के नागरिक झोपडी आणि चाळीमध्ये राहत आहेत. आरोग्य निकषांनुसार प्रत्येक ३० ते ४० हजार लोकसंख्येसाठी एक आरोग्य केंद्र असणे आवश्यक असताना शहरात केवळ २७ आरोग्य केंद्र आहेत. त्यामुळे एक ते दीड लाख लोकसंख्येचा भार एका आरोग्य केंद्रावर पडतो आहे. हा ताण कमी करण्यासाठी तसेच शहरातील नागरिकांना घराजवळच विनामुल्य



आरोग्यसुविधा मिळावी, या उद्देशातून महापालिकेने शहरात ५० ठिकाणी आपला दवाखाना उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला होता. त्याचे कंत्राट 'मेडऑनगोस आपला दवाखाना' या संस्थेला देण्यात आले. या संस्थेला प्रत्येक रुग्णामागे दीडशे रुपये देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या संस्थेने 'वन रूपी क्लिनिक' संस्थेशी भागीदारी करून त्यांच्या माध्यमातून गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात शहरात २० ठिकाणी दवाखाने सुरु केले. या उपक्रमासाठी पाच वर्षांकरिता पालिकेने १६० कोटींचा खर्च अपेक्षित धरला आहे. या उपक्रमात गेल्या सहा महिन्यात ६९ हजार नागरिकांना विनामुल्य आरोग्य सुविधा देण्यात आली आहे. संबंधित संस्थेने शुक्रवारपासून अचानकपणे सर्वच दवाखाने बंद केले आहेत. या संदर्भात वन रूपी क्लिनिकचे संचालक डॉ. राहुल घुले यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी या वृत्तास दुजोरा दिला. गेल्या सहा महिन्यांच्या कामाचे पैसे संबंधित संस्थेकडून मिळालेले नाही. तरीही आम्ही सहा महिने दवाखाने चालविले. आता पैशांअभावी हा उपक्रम सुरु ठेवणे शक्य नसल्यामुळे दवाखाने बंद केल्याचे त्यांनी सांगितले.

## प्रदूषण नियंत्रणात अडथळा

**वसई (गणेश बागडे)-** केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत वसई- विरार शहरातील प्रदूषण दूर करण्यासाठी पालिकेला ३२ कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. हा निधी कुठे कसा वापरायचा याबाबत महापालिकेने आराखडादेखील तयार केला आहे. मात्र करोना संकटामुळे पालिकेला प्रदूषण नियंत्रणासाठीच्या उपाययोजना करण्यात अडथळा येत असल्याने हा निधी पालिकेच्या तिजोरीमध्ये धूळ खात पडला आहे.



वसई -विरार शहरातील प्रदूषण वाढले असून हवेची गुणवत्ता घसरत चालली होती. हे प्रदूषण कमी करून हवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी पालिकेने मेसर्स टंडन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीची सल्लागार म्हणून नियुक्ती केली होती. कंपनीने याबाबतचा कृती आराखडा तयार केला होता. तो आराखडा पालिकेने केंद्र शासनाकडे सुपूर्द केला होता. त्याला मंजुरी मिळाली असून केंद्राकडून पालिकेला १६ कोटी रुपयांचा पहिला हप्ता मिळाला होता. तर पालिकेला नुकताच दुसऱ्या टप्प्यातील १६ कोटींचा निधीदेखील उपलब्ध झाला आहे. पहिल्या टप्प्यातील निधी उपलब्ध झाल्यानंतर पालिकेने हा निधी कुठे आणि कसा खर्च करावा यासाठी कृती आराखडा तयार केला होता. तसेच आराखड्याअंतर्गत प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जाणार होत्या. कामासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आल्या होत्या. मात्र करोना संकटामुळे एप्रिल महिन्यात लॉकडाऊन झाले आणि सर्व विकास कामे आणि इतर कामे ठप्प झाली. महापालिकेने केवळ करोना नियंत्रणाकडे लक्ष केंद्रित केले होते. त्यामुळे प्रदूषण नियंत्रणासाठी तयार करण्यात आलेला आराखड्याची अंमलबजावणी झाली नाही. परिणामी, लवकर निधी मिळूनही पालिकेला प्रदूषण नियंत्रणाबाबत कोणतीही कामे करता न आल्याने मिळालेला ३२ कोटींचा निधी पालिकेच्या तिजोरीमध्ये धूळ खात पडला आहे.

मागील वर्षी केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार वसई विरार महापालिकेचा समावेश मिलियन प्लस सिटी या योजनेमध्ये करण्यात आला आहे. हवा गुणवत्तेसाठी या योजनेअंतर्गत महापालिकेला केंद्राकडून हे अनुदान मिळाले आहे. त्यात पर्यावरणस्नेही २ विद्युत बसेस, १७ सीएनजी बसेस वसईत धावणार असून विरार येथे पालिका मुख्यालयाजवळ बहुमजली वाहनतळ उभारले जाणार आहे. शहरात ४ ठिकाणी मियावाकी पध्दतीने उद्यान साकारले जाणार आहे. शहराच्या ४ प्रमुख मध्यवर्ती ठिकाणी कारंजे उभारणे, १६ ठिकाणी हवेचे प्रदूषण नियंत्रण करणारे विंड ऑग्मेंटेशन प्युरिफाईंग युनिट उभारणे, ३ ठिकाणी हवेची गुणवत्ता तपासणारे यंत्र बसवणे आदींचा समावेश आहे.

## पाणी तुंबणाऱ्या ठिकाणांवर 'सीसीटीव्हीं'ची नजर

**कल्याण-** बुधवारी झालेल्या मुसळधार पावसामध्ये अनेक ठिकाणी नाले तुंबून पाणी साचल्यानंतर महापालिकेने आता अशा भागांमध्ये ठोस उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून पाणी तुंबणाऱ्या २२१ ठिकाणी ५५१ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.



या निर्णयामुळे पावसाचे पाणी तुंबलेल्या भागात पाण्याचा तात्काळ निचरा करणे तसेच त्या ठिकाणी इतर उपाययोजना करणे शक्य होणार असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. कल्याण-डोंबिवली शहरात बुधवारी मुसळधार पाऊस झाला. नाले तुंबल्याने पाणी रस्त्यावर आले. काही गृहसंकुलांमध्येही पाणी साचले. या घटनेनंतर महापालिका प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. पाणी तुंबणाऱ्या भागांची तात्काळ माहिती मिळावी आणि त्याठिकाणी साचलेल्या पाण्याचा निचरा तात्काळ करता यावा, यासाठी अशा भागांवर पालिका विशेष लक्ष ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. शहरांमध्ये पाणी तुंबणारी २२१ ठिकाणे असून त्याठिकाणी ५५१ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून लक्ष ठेवले जाणार आहे. पुढील चार महिने पावसाळ्याच्या कालावधीत ही उपाययोजना केली जाणार आहे.

## समाजमाध्यमांवर एसटीचा इतिहास उलगडणार

**ठाणे-** राज्य परिवहन सेवेच्या बसची निर्मिती कशी झाली, पहिली बस सेवा कोणत्या मार्गावर सुरू झाली, बसचे तिकीट भाडे किती होते आणि एसटीच्या ताफ्यात आतापर्यंत दाखल झालेल्या बसचे मॉडेल, अशी सविस्तर माहिती राज्य परिवहन प्रशासनाने 'वाहननामा' मालिकेतून समाजमाध्यमांद्वारे उपलब्ध केली आहे. प्रवाशांना एसटीच्या इतिहासाची माहिती व्हावी, या उद्देशातून हा उपक्रम राबविण्यात येत असून यामुळे फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आणि टेलिग्राम या समाजमाध्यमांवर आता एसटीचा इतिहास उलगडणार आहे. राज्य परिवहन महामंडळाचा यंदा ७३ वा वर्धापन दिन नुकताच पार पडला. त्या वेळेस महामंडळाचे फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम आणि टेलिग्राम या समाजमाध्यमांवर अधिकृत खाते सुरू करण्यात आले. या समाजमाध्यमांचा महामंडळाकडून प्रभावीपणे वापर करण्यास सुरुवात झाली आहे.



एसटीचा डिजिटल संवाद या उपक्रमातून महामंडळ प्रवाशांशी संवाद साधणार असून त्यामध्ये महामंडळविषयक दैनंदिन घडामोडी, महत्त्वपूर्ण घटना, विशेष सूचना आणि मार्गदर्शन प्रवाशांना केले जाणार आहे. याशिवाय, एसटीचा १९४८ पासून ते आतापर्यंतचा इतिहास उलगडला आहे. त्यासाठी समाजमाध्यमांवर 'वाहननामा' मालिका महामंडळाने सुरूकेली आहे. एसटी बसची निर्मिती कशी झाली, पहिली बस कधी आणि कुठे तयार करण्यात आली, कोणत्या मार्गावर पहिली बस सेवा सुरू झाली, पहिली आराम आणि वातानुकूलित बस, पहिली कार्यशाळा, बस आसन क्षमता, बस पूर्वी किती भाडे आकारत होती, अशी संपूर्ण माहिती वाहननामा मालिकेतून प्रवाशांना देण्यात येणार असल्याची माहिती एसटीच्या अधिकाऱ्यांनी दिली.

## नाट्यगृह खुली मात्र प्रयोग अशक्य!

**नवी मुंबई (तृप्ती गोरे)-** कोविड-१९ संसर्गामुळे महाराष्ट्रात टाळेबंदी लागू झाल्याने नाट्यगृहे बंद करण्यात आली होती. पुन्हा जूनमध्ये नाट्यगृहे ५० टक्के क्षमतेने सुरू करण्याला परवानगी देण्यात आलेली आहे. दुसऱ्या लाटेत आता नाट्यरसिक आणि नाट्यनिर्माते कसा प्रतिसाद देत आहेत, हे आगामी कालावधीत स्पष्ट होईल. मात्र यावर नाट्यनिर्माते खूश नसून राज्यातील सर्व नाट्यगृहे एकाच वेळेस सुरू केली तरच नाटकांचे प्रयोग करणे शक्य होईल, असे मत व्यक्त केले आहे. करोनाच्या पहिल्या लाटेत टाळेबंदीमध्ये शिथिलता दिल्यानंतर नोव्हेंबरमध्ये नाट्यगृहांना परवानगी देण्यात आली होती. मात्र ५० टक्के आसनक्षमता असल्याने नाटकांना प्रतिसाद नव्हता. त्यामुळे पुन्हा नाट्य निर्मात्यांना नाट्यगृह बुकिंगवर ७५ टक्के सूट देण्यात आली होती. डिसेंबर २०२० मध्ये नाट्यप्रयोगांना सुरुवात करण्यात आली. त्यांनतर पुन्हा मार्च महिन्यात करोनाने थैमान घालण्यास सुरुवात केली. करोनाची दुसरी लाट येताच पुन्हा टाळेबंदी जाहीर केली. आता पुन्हा निर्बंध हटविण्यात आले आहेत. त्यानुसार ठाणे जिल्ह्यत आणि नवी मुंबई शहरात रुग्ण कमी झाले आहेत. त्यामुळे येथील नाट्यगृहे सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. मात्र यावर नाट्यनिर्मात्यांनी राज्यातील



नाट्यगृहे एकाच वेळी सुरू झाली तरच नाटकांचे प्रयोग करणे शक्य होणार आहे. आता ५० टक्के आसनक्षमतेने सुरू न करता १०० टक्के क्षमतेची गरज आहे. आधीच नाटकांना नाट्यरसिकांची दाद कमी झाली आहे त्यात ५० टक्के आसनक्षमतेने आणखी कमी होत आहे. एकूण ७५० नाट्य कर्मचारी आहेत, मागील वेळी फक्त १०० नाट्यकर्मींच्या हाताला काम मिळाले होते. उर्वरित ६५० कामगार वाऱ्यावर होते.

## ४७ अतिधोकादायक इमारतींत वास्तव्य

**नवी मुंबई (शकिल शेख)-** पावसाळा सुरू झाला असून अतिधोकादायक इमारतींची पडझड सुरू झाली आहे. मुंबईत घडलेल्या दुर्घटनेत ११ जणांचा जीव गेला आहे. नवी मुंबईतही हा प्रश्न गंभीर असून दरवर्षी धोकादायक इमारतींची संख्या वाढत आहे. या वर्षी ३२ इमारतींची वाढ होत धोकादायक इमारतींची संख्या ४७५ पर्यंत पोहोचली आहे. धक्कादायक म्हणजे अतिधोकादायक (राहण्यास अयोग्य) ६५ इमारतींपैकी ४७ इमारतींत नागरिकांचे वास्तव्य आहे. गेल्या वर्षी भिवंडी इमारत दुर्घटनेत ४० जणांना जीव गमवावा लागला. बुधवारी मुंबईती मालाड परिसरातील दुर्घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला आहे. दरवर्षी इमारत दुर्घटना वाढत आहेत. नवी मुंबईतही या धोकादायक इमारतींचा प्रश्न गेल्या काही वर्षांपासून निर्माण झाला आहे. अद्याप मोठी दुर्घटना घडली नसली तरी इमारती पडझडीच्या घटना पावसाळ्यात नेहमी होत आहेत. गेल्या वर्षीच्या पाहणीत शहरात ४४३ धोकादायक इमारती होत्या, तर अतिधोकादायक ६१ इमारती होत्या. नवी मुंबई महापालिकेने अद्याप या वर्षीची धोकादायक, अतिधोकादायक इमारतींची यादी अद्याप जाहीर केली नाही. मात्र या इमारतींचे सर्वेक्षण पूर्ण झालेले आहे. यात या वर्षी धोकादायक इमारतींची संख्या ही ४७५ इतकी झाली आहे, तर अतिधोकादायक ६५ इमारती आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत या दोन्ही प्रकारच्या इमारतीत वाढ झाली आहे, ही चिंतेची बाब आहे. धोकादायक इमारतींत ३२ने वाढ झाली आहे, तर अतिधोकादायक इमारतींत पाचने वाढ झाली आहे. विशेष



म्हणजे या अतिधोकादायक इमारतींत नागरिकांचे वास्तव्य आहे, हे अधिक धक्कादायक आहे. अशाप्रकारच्या ४७ इमारतींत नागरिकांचे वास्तव्य आहे. अशा इमारतीत एखादी दुर्घटना घडल्यास याला जबाबदार कोण, असा प्रश्न निर्माण झाला आहे. गेल्या वर्षी धोकादायक इमारतींच्या दुर्घटनेनंतर न्यायालयाकडूनच जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानंतर राज्य सरकारसह मुंबई, नवी मुंबई महापालिकेसह विविध महापालिकांना धोकादायक इमारतीबाबत तसेच बेकायदा इमारतींबाबत काय प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येते तसेच,पालिकेकडून या धोकादायक इमारतींची संरचनात्मक पाहणी केली जाते का? याबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले होते.

## पावसाळी पर्यटनस्थळांवरील बंदीमुळे रोजगारावर गदा

**बदलापूर (आकाश कांबळे)-** टाळेबंदीमुळे आधीच तोट्यात गेलेला व्यवसाय आता कुठे रुळावर येत असतानाच जिल्ह्यातील पावसाळी पर्यटनस्थळांवर जिल्हा प्रशासनाने बंदी घातली आहे. यामुळे पर्यटनस्थळांच्या परिसरात व्यवसाय करणाऱ्या आदिवासी तसेच खाद्यपदार्थ विक्रेत्यांच्या रोजगारावर पुन्हा संकट कोसळले आहे. बंदीमुळे पर्यटक आले नाही तर रानमेवा, रानभाज्या विकायच्या कुठे असा प्रश्न आदिवासींना पडला आहे. छोटेखानी छपरात खाद्यपदार्थांच्या किरकोळ विक्रीतून उदरनिर्वाह करणाऱ्या विक्रेत्यांनाही याचा फटका बसणार आहे. त्यामुळे त्यांच्यातही अस्वस्थता पसरली आहे. निसर्गसंपन्न असलेल्या ठाणे जिल्ह्यातील ठाणे, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, शहापूर, मुरबाड या तालुक्यांमध्ये पर्यटकांना आकर्षित



करणारी पर्यटनस्थळे आहेत. यात धरणाचे पाणलोट क्षेत्र, नद्यांचे काठ, धबधबे, गड किल्ले, माळरान अशा ठिकाणांचा समावेश आहे. निसर्गाच्या कुशीत असणारी ही स्थळे शहरांपासून बरीच दूर आहेत. पावसाळ्यात पर्यटकांचा ओघ वाढल्यानंतर येथील स्थानिक रहिवासी फळे, भाज्या, मासे विक्रीची दुकाने थाटतात. पर्यटकांना याच स्थानिकांच्या मदतीने अस्सल घरगुती जेवण आणि इतर खाद्यपदार्थांची चव चाखता येते. स्थानिकांनाही यातून चांगला रोजगार मिळतो. गेल्या काही वर्षांपासून सातत्याने जिल्ह्यातील पर्यटनस्थळांवर जिल्हा प्रशासनाकडून बंदी घातली जात असल्याने येथील रोजगार धोक्यात आला आहे.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# ‘कुणी कितीही स्ट्रॅटेजी केल्या, तरी २०२४ लाही मोदीच’

**मुंबई (योगेश होळंब)-** राजकारण्यांचा हुकमी एक्का म्हणून ओळख असणाऱ्या प्रशांत किशोर आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची मुंबईतील सिल्व्हर ओक या निवासस्थानी भेट झाली. भाजपचे फाइंड असणाऱ्या किशोर यांनी गेल्या निवडणुकीत शिवसेनेसाठी काम केलं होतं. आता, हेच प्रशांत किशोर राष्ट्रवादीच्या पवारांना भेटायला आल्याने काही नवीन गणिते जुळत आहेत का याची चर्चा रंगली होती. या भेटीनंतर भाजपा नेते आणि विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, त्यांनी स्ट्रॅटेजीचं उत्तर दिलंय.

कोणी कोणाची भेट घ्यावी, यावर कुठलही बंधन नाही. विरोधी पक्षाचे लोकं असू द्या, किंवा सत्ताधारी पक्षाचे नेते असू द्या. प्रत्येकजण आप-आपली स्ट्रॅटेजी तयार करत असतात. कोणी कितीही स्ट्रॅटेजीस् तयार केल्या तरी आजही मोदीच आहेत आणि २०२४ लाही मोदीच राहणार आहेत. २०२४ च्या निवडणुकांतही मोदींच्या



नेतृत्वातच भाजपाचं सरकार येईल, असा विश्वास देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, शिवसेना नेते खासदार अरविंद सावंत यांनीही या भेटीचं स्वागत केलं आहे.

बाळासाहेबांनाही राष्ट्रीय पातळीवर मराठी माणूस हवा होता. महाविकास आघाडी ही शरद पवारांच्या नेतृत्वात निर्माण झालीय. त्यामुळं शरद पवार पंतप्रधान झाल्यास आम्हाला आनंदच होईल, असं अरविंद सावंत यांनी म्हटलं आहे. तसेच, शरद पवार आणि प्रशांत किशोर यांच्या भेटीचं स्वागतच आहे. देशात एककल्ली कारभार सुरू आहे. देशहितासाठी चांगला विरोधी पक्ष आणि पर्याय आवश्यक आहे. काँग्रेसच्या वाताहातीमुळं भाजपचं फावलं. राजकारणात सर्वाधिक अनुभवी आणि अभ्यासू शरद पवार आहेत. शिवसेना ही दिलेला शब्द पाळणारी आहे. त्यामुळे शरद पवारांनीही तो विश्वास व्यक्त केलाय. त्यांनी शिवसेनेचे कौतुक केलंय, असंही सावंत यांनी म्हटलं. शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक निवासस्थानी प्रशांत किशोर सकाळी पोहोचले. त्यानंतर प्रशांत किशोर यांनी पवारांसोबत जेवणही केलं. या दोन्ही नेत्यांमध्ये तब्बल साडे तीन तास चर्चा झाली. या भेटीदरम्यान काही काळ राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटीलही उपस्थित राहिले. ही भेट संपल्यानंतर शरद पवार आमदार रोहित पवार यांच्यासह पुण्याच्या दिशेनं रवाना झाले. राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या भेटीमागे कोणतेही राजकारण नसल्याचं म्हणलं आहे. पवार म्हणाले, ’या भेटीमागे काही राजकारण नाही. स्वतः प्रशांत किशोर यांनीच हे जाहीर केले आहे की ते आता राजकीय रणनीतीकार म्हणून काम करणार नाहीत.

## म्युकरमायकोसिसच्या ३० टक्के रुग्णांवर उपचार अशक्य

**मुंबई (राजेश गायकवाड)-** म्युकरमायकोसिस या बुरशीच्या संसर्गाचा वेग अधिक असल्याने आणि वेळेवर निदान न झाल्याने सुमारे ३० टक्के रुग्णांवर कोणतेही उपचार



होऊ शकत नसल्याचे केईएम रुग्णालयातील डॉक्टरांच्या निदर्शनास आले आहे. अॅम्पोटेरेसिन बी इंजेक्शनचा पुरेसा साठा उपलब्ध होत नसल्यामुळे या समस्येत भर पडली आहे. उपचार न होण्यामागे रुग्ण उशिरा दाखल होणे हेही एक कारण आहे. मुंबईत सर्वाधिक म्हणजे सुमारे २५ टक्के रुग्ण केईएममध्ये दाखल आहेत. राज्यात सुमारे सात हजार म्युकरमायकोसिसचे रुग्ण आढळले. त्यापैकी ६०० रुग्णांचा मृत्यू झाला. राज्यात या आजाराचा मृत्युदर आठ टक्क्यांवर गेला आहे. मुंबईत म्युकरमायकोसिसचे ६३८ रुग्ण असून यातील १३० हून अधिक रुग्ण केईएममधून उपचार घेत आहेत. सध्या केईएममध्ये १०४ रुग्ण दाखल आहेत. ‘केईएममधील बहुतेक रुग्ण अन्य रुग्णालयांमधून पाठविलेले आहेत. त्यामुळे आमच्याकडे आलेल्या अनेक रुग्णांमध्ये म्युकरने आधीच शरीरावर दुष्परिणाम केलेला असतो. त्यात हा रोग पसरण्याची तीव्रता अधिक आहे. या रोगाचे रुग्ण दाखल होतात, परंतु तोपर्यंत अनेकांच्या बाबतीत हा रोग मेंदूपर्यंत पोहोचलेला असतो. त्यामुळे शस्त्रक्रिया करून किंवा अन्य उपचार करूनही काही फायदा नसतो.

## मुंबईत पाऊस कमी, तरीही रस्ते पाण्यात

**मुंबई (विशाल पाटील):** मुंबईत शनिवारी तुलनेने कमी पाऊस होऊनही अनेक भागांत पाणी तुंबले आणि मुंबईचा वेग मंदावला. रेल्वे रूळांवर पाणी साचल्याने मध्य, हार्बर मार्गावरील रेल्वे वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. तर दादर, शीव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावर पाणी तुंबल्याने वाहतुकीचा खोळंबा झाला. पहाटेपासून सुरू असलेली मुसळधार आणि दुपारी समुद्रास आलेली भरती यामुळे साचलेल्या पाण्याचा निचरा न झाल्याने मुंबईकरांचे हाल झाले. दरम्यान मुंबई, ठाण्यासह उपनगरांना दिलेला दक्षतेचा इशारा कायम असून रविवारी मुंबई, ठाणे, रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्यांत अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

हवामान विभागाच्या नोंदीनुसार बुधवारच्या तुलनेत शहरात शनिवारी कमी पावसाची नोंद झाली. शनिवारी सकाळी ८.३० वाजेपर्यंत कुलाबा केंद्राने सरासरी ९० मिलीमीटर, तर सांताक्रूझ केंद्राने सरासरी १०७ मिलीमीटर पावसाची नोंद केली. शनिवारी सकाळी ८.३० ते संध्याकाळी ५.३०पर्यंत सांताक्रूझ येथे ६४.८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. शहर आणि पूर्व उपनगरांच्या तुलनेत पश्चिम उपनगरात पाऊस अधिक होता.



मुसळधार पावसामुळे कुर्ला ते सायन रेल्वे स्थानकादरम्यान आणि चुनाभट्टी स्थानकात साचलेल्या पाण्यामुळे शनिवारी मध्य रेल्वे मुख्य मार्गावरील सीएसएमटी ते ठाणे आणि सीएसएमटी ते वाशी हार्बर लोकल सेवा विस्कळीत झाली. मध्य रेल्वेवरील लोकल दुपारी १२ पर्यंत सुरळीत होत्या. परंतु भरतीही आणि मिठी नदीतील पर्जन्यवाहिन्यांचे दरवाजे बंद केल्याने रुळांवर पाणी साचले. रुळांवरील पाणी वाढताच दादर ते कुर्ला दरम्यान दुपारी सव्वा बारापासून लोकल सेवा बंद ठेवण्यात आली. पश्चिम रेल्वेवरील लोकल सेवा मात्र सुरळीत सुरू होती.

सखल भागांतील रस्त्यांवर पाणी साचल्याने रहदारीचा वेग मंदावला. वाहतूक पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दादर, शीव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावर दोन फुटांहून जास्त पाणी साचले होते. त्यामुळे पाणी ओसरेपर्यंत हा मार्ग बंद करून वाहतूक पर्यायी मार्गावर वळवण्यात आली. पश्चिम उपनगरांतील सर्व भुयारी मार्गांमध्ये (सब-वे) पाणी साचल्याने वाहतूक मंदावली. सर्वसाधारणपणे पूर्वमोसमी पाऊस आणि परतीचा पाऊस विजांच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह पडतो. यावर्षी मोसमी पाऊस मुंबईत दाखल होऊन चार दिवस लोटले तरीही विजांचा कडकडाट कमी झालेला नाही; कारण पावसाने पूर्ण महाराष्ट्र व्यापला असला तरीही अद्याप पूर्ण देश व्यापलेला नाही. एखाद्या वेळी पावसात मोठा खंड पडला तर वाढलेल्या आद्रतेमुळेही ढगांचा गडगडाट होतो.

## केक, पेस्ट्रीतून हाय प्रोफाईल लोकांना ड्रग्सचा पुरवठा; NCBने बेकरीवर टाकला छापा

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** नारकोटिक्स कंट्रोल ब्युरो मोठी कारवाई करत एका बेकरीवर छापा टाकला. एनसीबीची ही कारवाई यशस्वी ठरली. कारण या बेकरीमध्ये महागडा १६० ग्रॅम गांजा मिळाला आहे. एनसीबीने पहिल्यांदाच अशा ड्रग्ज बेकरी रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. मालाड पूर्वेतील ऑर्लेम येथे हा छापा टाकून एका महिलेसह तिघांना अटक करण्यात आली.

एनसीबी अधिकाऱ्यांना मुंबईच्या मालाड येथील एका बेकरीतून ड्रग्जचा पुरवठा केला जात असल्याची गुप्त माहिती मिळाली होती. याच माहितीच्या आधारावर अधिकाऱ्यांनी कारवाई केली. अधिकाऱ्यांनी संबंधित बेकरीत थेट छापा टाकला. यावेळी एका डब्ब्यात अधिकाऱ्यांना १६० ग्रॅम गांजा मिळाला. पोलिसांनी बेकरीतील कर्मचाऱ्यांची चौकशी केला तेव्हा सर्व प्रकार उघड झाला. एनसीबीने काल मुंबईच्या ऑर्लेम, मालाड येथे ८३० ग्रॅम एडिबल वीड पॉट ब्राउनी एडिबल कॅनाबीस व ३५ ग्रॅम मारिजुआनाचे एकूण १० नॉन ब्राऊनी केक्स जप्त केले आणि



एल्स्टन फर्नांडिस नावाच्या एका व्यक्तीला अटक केली. पुढील कारवाईदरम्यान एनसीबीने वांद्रे येथील जगत चौरसिया नावाच्या मुख्य पुरवठादारास काल रात्री उशिरा १२५ ग्रॅम मारिजुआनासह अडवले. एनसीबी ब्रॉनी वीड पॉट केक्सद्वारे तरुण पिढीतील पदार्थांचे सेवन करण्याचा एक नवीन ट्रेंड शोधून काढला.

## मालाड इमारत दुर्घटनेच्या न्यायालयीन चौकशीचे आदेश

**मुंबई (नितीन देवळेकर)-** मालवणी येथे इमारत कोसळून १२ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेची उच्च न्यायालयाने शुक्रवारी गंभीर दखल घेतली. ही मानवनिर्मित चूक असल्याचे नमूद करत या दुर्घटनेच्या न्यायालयीन चौकशीचे आदेश न्यायालयाने दिले व त्याचा अंतरिम अहवाल २४ जूनपर्यंत सादर करण्यास सांगितले. यापुढे इमारत कोसळून लोकांचे जीव गेल्याच्या घटना घडल्यास कठोर भूमिका घेतली जाईल, असा इशाराही न्यायालयाने मुंबई महानगर प्रदेशातील सर्व महापालिकांना दिला. करोनाकाळातही मोडकळीस आलेल्या इमारती रिकाम्या करण्याच्या कारवाईस मुभा देऊन देखील गेल्या महिन्याभरात मुंबई व उल्हासनगर येथे प्रत्येकी दोन इमारती कोसळण्याच्या घटना घडून २४ जणांना जीव गमवावा लागला आहे, तर २३ जण जखमी झाले आहेत, असे न्यायालयाने सुनावले. ‘पालिका लोकांच्या जीवाशी खेळ करू शकत नाहीत.



या दुर्घटनांसाठी आम्ही प्रभाग अधिकाऱ्यांना जबाबदार धरू. पावसाच्या पहिल्याच दिवशी आठ निष्पाप मुलांचा जीव गेला, हे अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. या दुर्घटनेवरून मुंबई आणि ‘एमएमआर’मधील पालिकांमध्ये कायदाच धाब्यावर बसवून कारभार सुरू असल्याचेही सिद्ध होते. आठ मुलांच्या मृत्यूच्या दुःखाची नगरसेवकांनीही जाणीव ठेवायला हवी. प्रत्येक पावसात इमारती कोसळून लोकांचा जीव जातो. वारंवार घडणाऱ्या या घटनांतून धडा घेऊन या दुर्घटनांना प्रतिबंध का केला जात नाही?,’ असे न्यायालयाने सुनावले. यापुढे अशा दुर्घटना घडल्यास न्यायिक चौकशी मागे लावण्यासाठी आम्ही मागेपुढे पाहाणार नाही, अशी ताकीद न्यायालयाने दिली. ‘मालाड येथील दुर्घटनेत आठ मुलांचा मृत्यू झाला असून आम्हाला त्यामुळे खूपच वेदना झाल्या आहेत. एकीकडे आम्ही करोनाच्या उपचारांशी संबंधित सुनावणी घेऊन तिसऱ्या लाटेपासून लहान मुलांचे संरक्षण कसे करायचे या दृष्टीने उपाययोजना करण्याचे आदेश देत आहोत.

## सर्वाधिक विनाहेल्मेट दुचाकीस्वार मुंबईत

**मुंबई (विशाल कारंडे)-** हेल्मेट वापरण्याबाबत जनजागृती, सक्ती अशा वेगवेगळ्या उपायांनंतरही हेल्मेटच्या वापराबाबत वाहनचालक गंभीर नसल्याचे दिसत आहे. मुंबई महानगरात गेल्या पाच महिन्यांत हेल्मेट परिधान न केल्याच्या ५ लाख ६५ हजार ५६१ गुन्हे नोंद झाले आहेत, हेल्मेट परिधान न करण्यात मुंबईकर आघाडीवर असून सर्वाधिक ३ लाख ९० हजार ६७८ जणांवर कारवाई झाल्याची माहिती महामार्ग पोलिसांकडून देण्यात आली. दुचाकीचालकाबरोबरच त्यासोबत मागे बसून प्रवास करणाऱ्यानेही हेल्मेट घालणे बंधनकारक आहे. मात्र काही दुचाकीचालक हेल्मेट घालतात, तर सोबत प्रवास करणाऱ्याकडून मात्र दुर्लक्ष केले जाते. वाहतूक पोलिसांकडून करण्यात येणाऱ्या कारवाईचाही काही फायदा होत नसल्याचे दिसत आहे. एखादा अपघात झाला आणि चालकाने हेल्मेट घातले तर प्राण वाचतील अशी कारवाईमागील धारणा असते. परंतु त्याला अनेक जण त्याकडे दुर्लक्ष करतात. २०१६ मध्ये राज्यात हेल्मेटसक्ती करण्यात



आली होती. त्याला मुंबईत काही प्रमाणात विरोध होतानाच पुणे, कोल्हापूर व अन्य भागांतूनही विरोध झाला होता. ऑगस्ट २०१६ मध्ये हेल्मेट नसलेला दुचाकीस्वार पेट्रोल पंपावर आल्यास त्याला इंधन दिले जाऊ नये, असा निर्णय परिवहन विभागाने घेतला होता. त्याला खुद्द दुचाकीस्वारांबरोबरच पेट्रोल पंप चालकांनीही विरोध केला.

## घरोघरी लसीकरणासाठी पालिकेला परवानगी देणार का?

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** घरोघरी लसीकरणाची मोहीम राबवण्यासाठी केंद्र सरकारकडे परवानगी मागितली असल्याचे पालिकेने उच्च न्यायालयाला सांगितले. त्यानंतर या मोहिमेसाठी पालिकेला परवानगी देणार का, अशी विचारणा करून सोमवारी भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले. घरोघरी लसीकरणाचे धोरण बंधनकारक आहे की नाही, अशी विचारणाही न्यायालयाने यावेळी केंद्र सरकारला केली. ही मोहीम राबवण्यात, त्याबाबत धोरण जाहीर करण्यात तुम्हाला नेमकी अडचण काय आहे? असा प्रश्न उपस्थित करून न्यायालयाने पुन्हा एकदा केंद्र सरकारच्या आडमुठ्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. तसेच लोकांचे जीव वाचवण्याच्या दृष्टीने आतातरी सकारात्मक निर्णय घ्या आणि केरळ जम्मू काश्मीरप्रमाणे देशात सर्वत्र घरोघरी लसीकरणाला परवानगी देण्याचे न्यायालयाने म्हटले. वयोवृद्ध, अंथरुणाला खिळलेल्या आणि अपंग



व्यक्तींना लसीकरण केंद्रावर जाऊन लस घेणे शक्य नाही. त्यामुळे त्यांच्यासाठी घरोघरी जाऊन लसीकरणाला परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्याचे आदेश न्यायालयाने सरकारला दिले होते. मात्र वारंवार आदेश देऊनही केंद्र सरकार भूमिका बदलेली नाही. पालिका आणि राज्य सरकारने केंद्र सरकारकडे घरोघरी लसीकरणासाठी परवानगी मागितल्याबाबतही विचारणा केली होती. मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी यांच्या खंडपीठासमोर झालेल्या सुनावणीच्या वेळी पालिकेने न्यायालयाच्या आदेशापूर्वी म्हणजेच मार्च महिन्यात ही परवानगी मागितली होती. शिवाय जून महिन्याच्या सुरुवातीलाही पुन्हा एकदा घरोघरी लसीकरणाला परवानगी देण्याची विनंती केल्याचे न्यायालयाला सांगण्यात आले. त्याची दखल घेत पालिकेच्या मागणीवरील निर्णयाबाबत न्यायालयाने केंद्र सरकारला विचारणा केली. त्यावर सोमवारपर्यंत माहिती घेऊन सांगण्याचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल अनिल सिंह यांनी न्यायालयाला सांगितले.

## पहिल्या लाटेत सुरक्षित राहिलेल्या गोराईत करोनाचा संसर्ग

**मुंबई (सम्यक कासारे):** मुंबईच्या कुशीत वसलेले आणि तरीही मुंबईपासून काहीसे आलिप्त असलेले बोरिवलीजवळील गोराई गावातही आता करोनाचा संसर्ग पोहोचला आहे. मात्र बोटींची सोय नसल्यामुळे या रुग्णांना उपचारासाठी किंवा लसीकरणासाठी मीरा-भाईंदरमार्गे बोरिवलीत यावे लागत आहे. त्यामुळे गोराई गावातच लसीकरण केंद्र व विलगीकरण केंद्र सुरू करावे, अशी मागणी गावकरी करू लागले आहेत. मुंबईपासून जवळ आणि तरीही मुंबईपासून काहीसे विलग असलेले गोराई गाव करोनाच्या दोन लाटांमध्ये काहीसे विलगीकरणातच होते. गोराई जेट्टीवरून बोटीने या गावात जावे लागते. मात्र टाळेबंदीच्या काळात बोटी बंद असल्यामुळे हे गाव आपोआपच करोनापासून सुरक्षित राहिले. गेल्यावर्षी रस्त्यावरून मीरा-भाईंदरमार्गे येणाऱ्या वाहनांवरही नागरिकांनी पाळत ठेवून बाहेरच्या



लोकांना गावात प्रवेश करू दिला नाही. मात्र दुसऱ्या लाटेच्या अखेरीस या गावात करोनाच्या रुग्णांची संख्या वाढू लागली. मात्र, आता गावातील लोकांना उपचारासाठी मुंबईत येणेही मुश्कील झाले आहे. निर्बंध शिथिल झाल्यानंतर सध्या बोटसेवा सुरू झालेली असली तरी बोटीची एकच फेरी चालू आहे. त्यामुळे नागरिकांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. तेथील नागरिकांना मीरा भाईंदरमार्गे प्रवास करून उपचारांसाठी मुंबईत दाखल व्हावे लागते आहे. त्यामुळे या गावातच एखादे विलगीकरण केंद्र उभारावे, अशी मागणी गावकरी करू लागले आहेत. माजी नगरसेवक शिवानंद शेट्टी यांनी याप्रकरणी पालिका आयुक्तांना व आर मध्य विभाग कार्यालयाला पत्र पाठवून स्वतंत्र लसीकरण केंद्राची व विलगीकरण केंद्राची मागणी केली आहे.

या गावाने पहिल्या लाटेत स्वतःला सुरक्षित ठेवले, पण आता गावात विलगीकरण केंद्र दिले तर डॉक्टर, आरोग्यसेवक यांचा वावर गावात वाढेल आणि करोना पसरण्याचीच अधिक शक्यता आहे. त्यापेक्षा रुग्णांनी रुग्णवाहिकेतून मुंबईत येऊन येथे विलगीकरणात राहावे, हे जास्त सोयीस्कर ठरेल, असे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. करोनाचा रुग्ण आढळल्यास अपुऱ्या सुविधांमुळे घरातच विलगीकरणात राहणे शक्य नाही. तसेच बोट बंद असल्यामुळे ३० ते ३५ किमी अंतर कापून लसीकरण केंद्रावर पोहोचावे लागते. तेथे अगोदरच बोरिवलीतील स्थानिकांनी रांग लावलेली असते. त्यामुळे येथील रहिवासी लसीकरणापासून वंचित राहिले आहेत. गोराई गावाची लोकसंख्या पाच हजार आहे. त्यांच्यासाठी लसीकरण केंद्र सुरू करण्याचा प्रयत्न आहे.

## इमारतींचे संरचनात्मक परीक्षण करण्याचे आवाहन

**मुंबई (विशाल पाटील)-** मालाडमध्ये इमारत पडून झालेल्या दुर्घटनेत १२ जणांचे जीव गेल्यानंतर पालिकेची विभाग कार्यालये सावध झाली आहेत. ग्रँटरोड, नानाचौक परिसर असलेल्या डी विभाग कार्यालयाने रहिवाशांना इमारतींचे संरचनात्मक परीक्षण करवून घेण्याचे आवाहन केले आहे. धोकादायक परिस्थिती निर्माण झाल्यास आपत्कालीन नियंत्रण कक्षाला कळवण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

मुंबईतील सर्वाधिक जुन्या व उपकर प्राप्त इमारतींची संख्या शहर भागात जास्त आहे. त्यामुळे शहर भागात इमारती पडण्याचा धोका असतो. तसेच ३० वर्षे जुन्या इमारतींचे सर्वेक्षण करून त्याची स्थिती तपासण्याचे पालिकेचे धोरण आहे. पालिकेच्या संकेतस्थळावर संरचनात्मक परीक्षण करणाऱ्या परीक्षकांची यादी दिली जाते. या परीक्षकांकडून रहिवाशांनी



आपल्या इमारतीचे परीक्षण करून त्याचा अहवाल पालिकेला सादर करायचा असतो. त्यानुसार इमारत धोकादायक आहे का हे पाहून इमारतींच्या स्थितीनुसार त्याची वर्गवारी केली जाते. तसेच आपल्या परिसरातील इमारतींना धोकादायक परिस्थिती निर्माण झाल्यास अथवा तसे निदर्शनास आल्यास आपल्या तक्रारी / सूचना तातडीने दूरध्वनीद्वारे द्याव्यात. आपत्कालीन कक्ष पूर्णवेळ कार्यरत असून त्याचा दूरध्वनी क्रमांक ०२२ – २३८६४००० असा आहे. तर पालिकेच्या मुख्य नियंत्रण कक्षाचा संपर्क क्रमांक ‘१९१६’ असा आहे.


**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता, यांचे कार्यालय**

**मध्य मुंबई विद्युत विभाग, मा. वां. विभाग सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई- ४०० ०१८**

**दूरध्वनी क्रमांक ०२२-२४९२४३४९** Email : elcentralmumbai.ee@mahapwd.com

**ई निविदा सूचना क्र. ०६ सन २०२०-२१**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग वरळी मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विद्युत अनुज्ञाप्तीधारक कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता बी-१ टक्केवारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता मध्य मुंबई विद्युत विभाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम |
|---|---|---|
| 1 | WESD/WRLS/OW/ 1021 /2021-22 Providing Electrical Installation for Additional High Security Barrack having G+2Floors (constructed in place of existing Barrack #2A) in Mumbai Central Prison/Aurther Road Jail Compound, Mumbai 400013 | Rs.1715916/- |
| 2 | SR/WESD/PDRS/ 1012 R /2021-22 Providing replacement to 2nos Old Outdated Electric 6 Passenger lifts (Gnd+7Upper Floors) installed at Kaveri Govt. Residential Bldg, located at seaface, Worli, Mumbai-400030 | Rs.4491636/- |
| 3 | SR/WESD/PDRS/ 1013 R /2021-22 Providing replacement to 2nos Old Outdated Electric 6 Passenger lifts (Gnd+7Upper Floors) installed at Sharavati Govt. Residential Bldg, located at seaface, Worli, Mumbai-400030 | Rs.4491636/- |
| 4 | SR/WESD/PDRS/ 1014 R /2021-22 Providing replacement to 2nos Old Outdated Electric 6 Passenger lifts (Gnd+7Upper Floors) installed at Gomati Govt. Residential Bldg, located at seaface, Worli, Mumbai-400030 | Rs.4491636/- |
| 5 | SR/WESD/PDRS/ 1015 R /2021-22 Providing replacement to 2nos Old Outdated Electric 6 Passenger lifts (Gnd+5Upper Floors) installed at C-wing, Gagan Mahal, Govt. Residential Bldg, located at seaface, Worli, Mumbai-400030 | Rs.3839660/- |

१. वरील अंदाजीत रक्कमेत जी. एस.टी समाविष्ठ नसून ठेकेदारांनी निवेदेत दर भरताना जी.एस.टी. वगळून दर नमुना करावा. अंदाजीत रकमेवर नमुन केलेल्या दरानुसार आलेल्या रकमेवर जी.एस.टी. १२ टक्के पर्यंत वेगळा अदा करण्यात येईल.

२. ई-निविदा उपलब्ध कालावधी: दि. १०.०६.२०२१ ते दि. २४.०६.२०२१ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत.

३. ई-निविदा उघडणे : दि. २७.०६.२०२१ रोजी सायंकाळी ११.०० नंतर सोईस्कर वेळेनुसार

४. खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

http://mahatenders.gov.in

(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती व सूचना फलकावर कळविण्यात येईल.)

जा.क्र. काअ/मममुंविवि/निविदा/१६४२/२०२१

दिनांक : ०७/०६/२०२१

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई विद्युत विभाग
सा. बां. विभाग वरळी

**डीजीआयपीआर/ २०२१-२०२२/७५७**

# आम्ही चंद्र, सूर्य मागत नाही: अजित पवारांच्या भेटीनंतर शाहू महाराज परखड बोलले!

**कोल्हापूर (राजेश गायकवाड)-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोल्हापूरात आज छत्रपती शाहू महाराज यांची भेट घेतली. मराठा आरक्षणावरुन सध्या राजकीय वातावरण ढवळून निघाले आहेत त्यामुळं अजित पवार व शाहू महाराजांच्या भेटीमुळं चर्चेला उधाण आलं आहे. उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत काय चर्चा झाली यावर छत्रपती शाहू महाराजांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

खासदार संभाजीराजे यांनी भाजपवर नाराजी व्यक्त केली होती. तसंच, ग्राम विकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी संभाजीराजे यांचे सतत केलेले कौतुक या सर्व पार्श्वभूमीवर अजित पवार यांची भेट राजकीय दृष्ट्या महत्त्वाची मानली जात आहे. शाहू महाराज व अजित पवार यांच्यात एक तास बैठक सुरु होती.

'अजित पवार व आमच्यात सर्व गोष्टींमध्ये चर्चा झाली आहे. समाजासाठी जास्तीत जास्त जे चांगलं करता येईल ते करा असं मार्गदर्शन केलं आहे, असं शाहू महाराजांनी म्हटलं आहे. तसंच, या भेटीबद्दल अजित पवार सविस्तर



सांगतील,' असंही छत्रपती शाहू महाराजांनी यावेळी सांगितलं आहे.

'मराठा आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिला आहे त्याचा अभ्यास करणं गरजेचं आहे. तो निकाल समजून घेऊन जे शक्य आहे ते सर्व केलं पाहिजे. मराठा आरक्षणाच्या इतर मागण्यांकडे सरकारचं लक्ष असून यापुढेही राहणार आहे, असं शाहू महाराजांनी म्हटलं आहे. तसंच, आंदोलनाबाबत आमच्यात कोणतीही चर्चा झालेली नाही,' असंही त्यांनी यावेळी स्पष्ट केलं आहे.

'केंद्र सरकारने लक्ष दिलं आणि त्यांना रस असला कर कायद्यात बदल करुनच तुम्हाला पुढचं पाऊल टाकता येईल हे आधीच सांगितलं पाहिजे. कायद्यात काय बसतं हे सांगायला मी काही कायदेपंडित नाही,' असंही त्यांनी यावेळी म्हटलं आहे. एबीपीला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

'आम्ही चंद्र, सूर्य मागत नाही. जे शक्य आणि व्यवहार्य असेल ते आम्हाला द्या. ठाकरे सरकारनं जे प्रयत्न सुरू केलेत ते समाधानकारक आहेत. कोर्टानं दिलेला निकाल खोडून काढणं आणि फेरविचार याचिका दाखल करणं या गोष्टी सरकारनं तातडीनं कराव्यात,' असंही शाहू महाराज यांनी म्हटलं आहे.

## ९ वीच्या विद्यार्थ्याचा ऑनलाइन प्रताप, मुंबई पोलिसांना राजस्थानपर्यंत पळविले

**मुंबई (विशाल पाटील)-** ऑनलाइन शिक्षणाच्या वेळी मजेसाठी सायबर बुलिंग करत शिक्षकांसमोर नकोसे कृत्य करणाऱ्या लहानग्याला अखेर साकीनाका पोलिसांनी शोधून काढले. पोलिसांनी पकडू नये म्हणून तो प्रॉक्झी नेटवर्कचा वापर करायचा. त्या मुलाला



शोधण्यासाठी पोलीस कधी डॉक्टर तर कधी शिक्षण विभागाचे कर्मचारी बनले. साकीनाका पोलिसांनी दोन दिवस राजस्थानच्या नागौर येथील उंटवालिया येथे वाळवंटात राहून त्या मुलाला ताब्यात घेतले. त्याला ताब्यात घेतल्यानंतर गावकऱ्यांनी आणि लष्करी अधिकाऱ्यांनी कारवाईत अडथळे आणण्याचा प्रयत्न केला. साकीनाका पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. कोविडमुळे राज्यात शाळा-महाविद्यालये बंद आहेत. विद्यार्थ्यांना घरी बसून लॅपटॉप किंवा स्मार्टफोनवरून ऑनलाइन शिक्षणाचे धडे घ्यावे लागत आहे. याचा फायदा घेत मौजेसाठी हॅकर्स सायबर बुलिंग करतात. फेब्रुवारी महिन्यात एका खासगी ॲप्सचे क्लासेस सुरू होते. त्यादरम्यान अज्ञात व्यक्ती हा शिक्षकांसमोर नकोसे कृत्य करायचा. घडल्याप्रकरणी ॲप्स कंपनीच्या वतीने साकीनाका पोलीस तक्रार दाखल केली. त्याची दखल घेत साकीनाका पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला. परिमंडळ-१० चे पोलीस उपायुक्त महेश रेडी यांनी अधिकाऱ्यांना तपासाच्या सूचना दिल्या. वरिष्ठ निरीक्षक बळवंत देशमुख यांच्या पथकातील उपनिरीक्षक सुनीता भोसले, जगताप, पांढरे, बरडे, चौगुले, पिसाळ यांनी तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी काही संशयित ५० नंबरची माहिती काढली.

## भांडुप परिमंडळात महावितरणच्या वीज बिल थकबाकीचा डोंगर कायम

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** राज्याच्या ग्रामीण भागाबरोबरच आता शहरी भागातही वीज बिलाच्या थकबाकीचा डोंगर कायम असल्याचे समोर आले आहे. महावितरणच्या भांडूप परिमंडळात भांडूप, मुलुंड, ठाणे, नवी मुंबई, पनवेल या शहरी भागांचा समावेश आहे. थकीत वीज बिलाच्या वसुलीसाठी महावितरणने विविध सवलत योजना जाहीर केल्यानंतरही तब्बल १४ लाख २८ हजार ग्राहक थकबाकीदार असून त्यांच्याकडे ६३२ कोटी रुपयांची थकबाकी कायम आहे. त्यामुळे थकीत वीज बिल वसूल करायचे कसे? असा



सवाल महावितरणसमोर उभा राहिला आहे. महावितरणच्या भांडूप परिमंडळात २५ लाख वीज ग्राहक असून त्यामध्ये घरगुती आणि औद्योगिक आणि वाणिज्यिक ग्राहकांची संख्या मोठी आहे. मात्र ग्राहक वीज बिलाची थकबाकी भरण्यास टाळाटाळ करत असल्याने थकबाकीचा आकडा कायम आहे. सध्या घरगुती ग्राहकांकडे १७३ कोटी रुपये, तर पथदिव्यांच्या वीज बिलाची १९३ कोटी रुपयांची थकबाकी आहे. उच्च दाब औद्योगिक ग्राहकांकडे ४७ कोटी, व्यावसायिक ग्राहकांकडे व्यावसायिक १०६.९ कोटी, लघुदाब औद्योगिक ८३.६५ कोटी, पाणीपुरवठा योजनांचे – ७.०५ कोटी, कृषी पंप ग्राहकांचे- ४.६५ कोटी थकीत आहेत. कोरोना महामारी असो की चक्रीवादळ असो, महावितरणचे कर्मचारी ग्राहकांना अखंडित वीज पुरवठा करण्यासाठी दिवसरात्र काम करतात. वीज पुरवठा खंडित झाला तर तो युद्धपातळीवर काम करून पूर्ववत केला जातो.

## रत्नागिरी भाजीमार्केट परिसरातील अनेक घरातून पाणी शिरले



**रत्नागिरी (अमोल गुडेकर):** शहरातील भाजी मार्केट मागील मुजावर कंपाऊंड येथील अनेक घरातून पावसाचे पाणी शिरले आहे. मच्छिमार्केट जवळून वाहणाऱ्या प्रवाहाने आपला मार्ग बदलला आहे. नगरपालिकेने नाले सफाई न केल्याने ही समस्या उद्भवल्याचे येथील नागरिकांचे म्हणणे आहे. अचानक पावसाचे पाणी घरात शिरल्याने येथील नागरिकांची तारांबळ उडाली आहे. गेल्या तीन तासांपासून चांदेराई परिसरात मुसळधार पाऊस कोसळत आहे त्यामुळे नदीच्या पाण्याच्या पातळीत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे अद्याप पुलापर्यंत पाणी आले नसले तरी असा पाऊस कोसळत राहिला तर केव्हाही पाणी पुलावर येऊ शकते व बाजारपेठेत पाणी भरू शकते.

## दिग्गज धावपटू मिल्खा सिंग यांच्या पत्नीचा कोरोनामुळे मृत्यू

**मुंबई (प्रथमेश चव्हाण)-** कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत अनेक कलाकार, खेळाडूंनी आपल्या जवळच्या व्यक्ती गमावल्या आहेत. भारताचे दिग्गज धावपटू मिल्खा सिंग यांनी देखील आपल्या सर्वात जवळची व्यक्ती कोरोनामुळे गमवली आहे. मिल्खा सिंग यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. पत्नीनं त्यांच्या साथ सोडली असून कोरोना विरुद्धची झुंज अपयशी ठरली आहे. मिल्खा सिंग यांच्या पत्नीचं कोरोनामुळे निधन झाल्याची माहिती मिळाली आहे. काही दिवसांपूर्वी या दोघांनाही कोरोनाची लागण झाली होती. मिल्खा सिंग यांची पत्नी निर्मल कौर यांना कोरोनाची लागण झाली होती. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ५ जूनला हेल्थ अपडेटनुसार मिल्खा सिंग यांची प्रकृती स्थिर असल्याचं तर त्यांच्या पत्नीची प्रकृती बिघडत असल्याचा रिपोर्ट आला होता. तीन आठवड्यांपूर्वी या दोघांनाही कोरोनाची लागण झाली होती. निर्मल कौर यांची कोरोना विरुद्धची झुंज अपयशी ठरली आणि



त्यांचा मृत्यू झाला. मिल्खा सिंग यांना श्वसनाचा त्रास होऊ लागल्यानं त्यांना चंदीगढमधील रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्यांची पत्नी देखील तिथेच उपचार घेत होती. मिल्खा सिंग यांची ऑक्सिजनची पातळी देखील कमी आली होती. मात्र उपचारादरम्यान त्यांची प्रकृती स्थिरावली. पत्नीच्या जाण्याने मिल्खा सिंग यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.

## ब्लॅकमेल करत महिला पोलीस अधिकाऱ्यावर लैंगिक अत्याचार: मुंबईतील संतापजनक घटना

**मुंबई (नितीन देवळेकर)-** मुंबईतील एका महिला पोलीस अधिकाऱ्याला ब्लॅकमेल करत तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. मागील काही दिवसांपासून आरोपी आपल्या दोन मित्रांच्या मदतीने पीडितेला ब्लॅकमेल करत तिच्यावर लैंगिक अत्याचार करत होता. आरोपींच्या सततच्या त्रासाला कंटाळून पीडित महिला पोलीसानं मेघवाडी पोलिसांत गुन्हा नोंदवला आहे. पोलिसांनी तक्रारीची शहानिशा केल्यानंतर तीन आरोपींविरोधात विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पीडित महिला मुंबई पोलीस दलात सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहे. काही वर्षांपूर्वी तिची सोशल मीडियावर एका खाजगी बँकेत अधिकारी पदावर काम करणाऱ्या व्यक्तीची ओळख झाली होती. सोशल मीडियावरून ओळख झाल्यानंतर दोघांत मैत्री वाढत गेली. कालांतराने यांच्या मैत्रीचं रुपांतर प्रेमसंबंधात झालं.



दरम्यान आरोपी प्रियकर एकेदिवशी पीडित महिलेला चकाला येथे भेटायला आला होता. याठिकणी आरोपीनं पीडित महिला पोलीस अधिकाऱ्याला शीतपेयातून गुंगीचं औषध दिलं आणि तिच्यावर बलात्कार केला. नराधम आरोपी एवढ्यावरचं थांबला नाही, तर त्याने लैंगिक अत्याचार करतानाचा व्हिडीओही शूट केला. हा व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देत आरोपीनं अनेकदा पीडितेवर लैंगिक अत्याचार केला आहे. पुढारीनं दिलेल्या वृत्तानुसार, अलीकडेच पीडित महिलेचं एका तरुणाशी लग्न ठरलं होतं. याची माहिती आरोपीला मिळताच त्यानं पीडितेच्या होणाऱ्या नवऱ्याला याची माहिती देऊन तिची बदनामी करण्याचा प्रयत्न केला. आरोपी पीडितेला सतत ब्लॅकमेल करून अत्याचार करत होता. त्यामुळे पीडित महिला अधिकाऱ्यानं आरोपीच्या त्रासाला कंटाळून मेघवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. तक्रार दाखल केल्यानंतर मेघवाडी पोलिसांनी पवई पोलिसांकडे हा गुन्हा वर्ग केला आहे.

## पुण्यात नवीन नियामवली, काय सुरू, काय राहणार बंद?

**पुणे (अभिजीत दोरल्लू)-** पुण्यात कोरोनाबाधित रुग्णांची संख्या आटोक्यात आल्यामुळे निर्बंध हटवण्यात आले आहे. आजपासून पुणेकरांना आणखी मोकळा श्वास घेता येणार आहे. पुण्यात आजपासून संध्याकाळी ७ वाजेपर्यंत दुकानं सुरू राहणार आहे तर हॉटेल्स, बार आणि रेस्टरंट रात्री १० वाजेपर्यंत खुली राहणार आहे. पुण्यात कोरोनाचा संसर्ग दर ५ टक्कांपेक्षा कमी आल्याने आणि ऑक्सिजन बेडसची संख्या पुरेशी असल्याने पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. नव्या नियमावलीनुसार, सर्व प्रकारची दुकाने आता सकाळी ७ ते संध्याकाळी ७ पर्यंत खुली राहतील. हॉटेल्स सकाळी ७ ते रात्री १० पर्यंत सुरू राहतील आणि पार्सल



रात्री ११ पर्यंत सुरू असेल.

मॉल्स, थिएटर्स, नाट्यगृह पन्नास टक्के क्षमतेनं खुली राहणार आहेत. तसंच इतर दुकांनाच्या वेळेतही संध्याकाळी ७ वाजेपर्यंत वाढ करण्यात आली आहे. हॉटेल्स बार, रेस्टारंट रात्री १० पर्यंत खुली राहणार आहेत पण पन्नास टक्के क्षमतेनं परवानगी देण्यात आली आहे. यासोबतच वाचनालयं, क्लासेस देखील सुरू होणार आहेत. उद्याने आणि स्पोर्ट्स देखील दोन वेळा खुली ठेवण्यास परवानगी देण्यात आली आहे.

अत्यावश्यक सुविधा वगळता इतर दुकाने शनिवारी ,रविवारी मात्र बंद राहणार आहे. अत्यावश्यक सुविधा वगळता इतर दुकाने आणि हॉटेल्सच्या या विकेंड लॉकडाऊन बाबत पुढील शुक्रवारी १८ जून रोजी आढावा घेतला जाणार आहे, त्यानंतर पुढील सूचना दिली जाईल.

मात्र, शहरात संचारबंदी रात्री १० पासून सुरू होईल

त्याचबरोबर, शहरातील उद्याने सकाळी ५ ते ९ आणि संध्याकाळी ४ ते ७ या वेळेत खुली राहणार आहे. Outdoor स्पोर्ट्स, क्रीडांगणे देखील सकाळी ५ ते ९ संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत खुली राहणार आहे. तसंच अभ्यासिका, वाचनालये ५० टक्के क्षमतेने संध्याकाळी ७ पर्यंत सुरू राहणार असल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

## मोजक्या वारकऱ्यांच्या उपस्थितीत आषाढी वारीचा निर्णय मान्य नाही : पायी वारीचा भाजप अध्यात्मिक आघाडी प्रमुखांचा निर्धार!

**नाशिक (अकिल शेख)-** राज्य सरकारच्या मोजक्या वारकऱ्यांच्या उपस्थितीत आषाढी वारीच्या निर्णयाचा विरोध केला. हा निर्णय घेऊन राज्य सरकारने वारकऱ्यांचा अपमान केला आहे. वारकऱ्यांना हा निर्णय मान्य नाही. त्यामुळे सरकारने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा. अन्यथा असंख्य पालख्या रस्त्यावर उतरतील. त्यामुळे कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्यास त्याला उपमुख्यमंत्री अजित पवार जबाबदार असतील, असे भाजपच्या आध्यात्मिक आघाडीचे प्रमुख तुषार भोसले यांनी म्हटले आहे. नाशिकमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

भोसले म्हणाले की, यंदाच्या आषाढी वारीसंदर्भात राज्य सरकारने घेतलेला निर्णय वारकऱ्यांना मान्य नाही. सरकारने



हा निर्णय तातडीने बदलावा. अन्यथा रस्त्यावर असंख्य पालख्या उतरतील, असा इशारा भाजपप्रणित आध्यात्मिक आघाडीचे नेते आचार्य तुषार भोसले यांनी दिला आहे.. ते म्हणाले की, मी स्वत: यंदा पायी पंढरपूरला जाणार आहे. वारकरी रस्त्यावर उतरल्यानंतर त्यांच्या केसालाही धक्का लागला तर गाठ भाजपशी आहे, हे राज्य सरकारने लक्षात ठेवावे. काही वारकरी आता राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची भेट घेणार आहेत. कुंभमेळ्याचे शेवटचे शाही स्नान झाल्यामुळे वारीला एवढी गर्दी होणार नाही. पालखी सोहळ्यात गर्दी होणार नाही, याची काळजी घेण्यासाठी वारकरी संप्रदाय तयार होता. मात्र, सरकारने परस्पर निर्णय घेतला. या निर्णयाला कोणत्याही वारकऱ्याने पाठिंबा दिला नसल्याचे तुषार भोसले यांनी सांगितले

## रत्नागिरीत २ किलो गांजा जप्त; एकास अटक

**रत्नागिरी (नेहा आरेकर)-** स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने शुक्रवारी दि.११ जून २०२१ रोजी मिरकरवाडा येथील जुनी पोलिस चौकीसमोर धाड टाकून सुमारे ४५ हजार ५४० रुपयांचा २ किलो ३७ ग्रॅम गांजा व इतर साहित्य जप्त केले. याप्रकरणी एकाला अटकही करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार , मोहम्मद ताहीर मस्तान (रा. वरचा मोहल्ला, मिरकरवाडा, रत्नागिरी) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्यावर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील पोलिस उपनिरीक्षक विकास चव्हाण, पोलिस हवालदार सुभाष भागणे, मिलिंद कदम, शांताराम झोरे, बाळू पालकर,



अरूण चाळके, प्रशांत बोरकर, पोलिस नाईक अमोल भोसले, रमीज शेख यांनी केली. या कामगिरीबद्दल पोलिस अधीक्षक डॉ. मोहितकुमार गर्ग यांनी अभिनंदन केले आणि यापुढेही अशीच कौतुकास्पद कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

## 'ती' बेपत्ता मुलगी सापडली; आरोपीच्या तपासात धक्कादायक बाब उघड

**पुणे (कमलाकर दांगट):** कात्रज येथून शनिवारी बेपत्ता झालेली अल्पवयीन मुलगी रविवारी पुणे रेल्वे स्थानकात सापडली. या मुलीला भीक मागायला लावायचे, या उद्देशाने तिचे अपहरण करण्यात आले होते, अशी धक्कादायक बाब पोलीस तपासातून उघड झाली आहे. या प्रकरणी सर्जेराव उमाजी बनसोडे याला पोलिसांनी अटक केली आहे. कात्रज येथून शनिवारी ही अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याने एकच खळबळ उडाली होती. या मुलीच्या पालकांनी या बाबत भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. त्यावरून अज्ञातावर गुन्हा दाखल




करण्यात आला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर पोलिसांनी सोशल मीडियावर मेसेज पाठवून, मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. दरम्यान, रविवारी सकाळी रेल्वे स्थानकात रेल्वे सुरक्षा दलाच्या जवानाला सदर मुलगी एका व्यक्तीसोबत आढळून आली. जवानाने संशयावरून त्या व्यक्तीला आणि मुलीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता, अपहरणाचा प्रकार समोर आला. सुरक्षा दलाने पोलिसांना त्याबाबत सूचित करून आरोपी आणि मुलीला शहर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. सर्जेराव उमाजी बनसोडे असे अटकेतील आरोपीचे नाव असून त्याच्या चौकशीत धक्कादायक बाबी उघड झाल्या आहेत.

## मराठा आरक्षण जनजागृतीसाठी २७ जून रोजी मुंबईत १०,००० मोटार सायकलींची रॅली: मेटेंचा निर्धार!

**पुणे (शुद्धोदन कठाडे):** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी दिल्लीवारी करून लोकांना वेड्यात काढले आहे, असा आरोप शिवसंग्रामचे नेते विनायक मेटे यांनी केला आहे. मराठा आरक्षणासाठी जनजागृती करण्यासाठी येत्या २७ जून रोजी मुंबईत दहा हजार मोटार सायकलींची रॅली काढण्यात येणार आहे, अशी माहिती विनायक मेटे यांनी दिली.

प्रसारमाध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, मराठा आरक्षणासाठी आम्ही गप्प बसणार नाही. प्रत्येक जिल्ह्यात तज्ज्ञांच्या बैठका घेण्यात येईल. त्यानंतर जिल्हानिहाय मेळावे आणि मोर्चे काढण्यात येणार आहे. हे मेळावे मूक असणार नाहीत. तर बोलके असतील. न्याय मागणारे असतील. संघर्ष करणारे असतील, असे सांगत मेटे म्हणाले की, भोसले कमिटीप्रमाणेच आम्ही कायदे तज्ज्ञांची समिती स्थापन करणार आहोत. समाजाच्यावतीने ही समिती नेमली जाईल. येत्या आठ दिवसात या समितीची घोषणा केली जाईल, अशी माहिती त्यांनी दिली. मेटे म्हणाले की, पाच मे रोजी आरक्षण रद्द झाले. एक महिना उलटला तरी सरकारने फेरविचार याचिका दाखल केली नाही. यापेक्षा निष्क्रियपणा दुसरा कोणता असू शकतो.

माजी न्यायामूर्ती भोसले यांच्या समितीने सांगितलेले ऐकायचे नाही, आमचे ऐकायचे नाही याचाच अर्थ सरकारला मराठा आरक्षणाचे देणेघेणे



नाही. केवळ दिल्लीला जाऊन ठाकरे-चव्हाणांनी लोकांना वेड्यात काढले आहे. दिल्ली भेटीत मराठा आरक्षणाचा विषय तोंडी लावायला होता. राज्यात मराठा समाजाचा रोष वाढल्यामुळे दिल्ली भेट झाली. काही तरी करतोय हे दाखवण्यासाठी ही भेट होती. प्रत्यक्षात मराठा समाजासाठी काहीच केले नाही, असे मेटे म्हणाले. मराठा समाजाच्या मागण्या सरकारने मान्य केल्या पाहिजेत. मागण्या मान्य न झाल्यास अधिवेशन चालू देणार नाही, असं सांगतानाच येत्या २७ जून रोजी मुंबईत दहा हजार मोटारसायकलची रॅली काढण्यात येणार आहे. मराठा समाजात जनजागृती करण्यासाठी ही बाईक रॅली काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मराठा आरक्षणासंदर्भात समाजाची जनजागृती करण्यासाठी पुण्यातून राज्यव्यापी दौऱ्याची सुरुवात करण्यात येणार आहे. पुण्यातून नगर नंतर उद्या औरंगाबाद, जालना, सोलापूरमध्ये जाऊ. दुसऱ्या टप्प्यात रायगड, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा आदी ठिकाणी जाणार आहोत. प्रत्येक जिल्ह्यात मोर्चा, मेळावा काढण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांना मराठा समाजाबद्दल आस्था नाही म्हणून त्यांनी अजून मराठा समाजाची बैठकही बोलावली नाही.